अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१५-१६
मागणी क्र. वाय-६, ४४०२ मृद व जलसंधारण
यावरील भांडवली खर्च (योजनेत्तर)
(४४०२११४८ व ४४०२११३९)

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी २०१४/प्र.क्र.२४१/पापु-१५

७ वा मजला, गो.ते. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
तारीख: ४ फेब्रुवारी, २०१६

वाचा :-

१) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दिनांक १२ जानेवारी,२०१५

प्रस्तावना :-

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात एकूण तरतूदीच्या ७०० टक्के एवढाच मर्यादित निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वित विभागाचे परिपत्रक दि.१७/४/२०१५ नुसार वितरीत करण्यात आलेला होता. आता उपरोक्त परिपत्रकानुसार कळविण्यात आले आहे की,योजनेत्तर अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ८५% व योजनांर्तगतसाठी पूर्वीची मर्यादा विहीत तशीच ठेवण्यात आलेली आहे. परंतु ०१-वेतन,०२-मजूरी, ०४-निवृत्तीवेतन विषयक खर्च,०६- दूरध्वनी,विज व पाणी शुल्क,१४-भाडेपट्टी व कर,२२ शस्त्रे व दारुगोळा, २४-पेट्रोल,तेल व वंगण यासाठीच्या योजनेत्तर व योजनांतर्गत तरतूदीच्या ३० % निधी पूर्वीच्या पध्दतीने एकत्रितरित्या वित्त विभागाकडून वितरीत करण्यात आला आहे.

२. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या आस्थापनेचा व इतर खर्च भागविण्यासाठी "४४०२ मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च " या लेखाशिर्षाखाली रु.२०३६.९३ लक्ष इतकी दत्तमत्त (४४०२११४८) व रु.५.०० लक्ष इतकी भारित (४४०२११३९) तरतूद करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकानुसार एकूण तरतूदीच्या १०० % व ८५% या मर्यादेपर्यंत आस्थापनाविषयक खर्च भागविण्यासाठी “४४०२ मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च” या लेखाशीर्षाखाली मंजूर झालेले लेखानुदान संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांना उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन आहे.

शासन निर्णय:-

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या आस्थापनेचा व इतर बाबींवरील माहे मार्च २०१६ या महिन्यापर्यंतचा खर्च भागविण्यासाठी मासिक खर्च विवरणपत्रानुसार पुढील विवरणपत्रातील स्तंभ-५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु. २००६.६९ लक्ष (रुपये वीस कोटी सहा लक्ष एकोणसत्तर हजार फक्त) इतके दत्तमत्त व रु. ४.२५ लक्ष (रुपये चार लक्ष पंचवीस हजार) इतके भारित अनुदान संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांना या शासन निर्णयान्वये मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

अ.क्र.	उपशिर्ष	सन २०१५-१६ करिता मंजूर तरतूद	विहीत केलेली मर्यादा (%)	वित्त विभागाने उपलब्ध करून दिलेले अंतिम अनुदान
१	२	३	४	५
१	०१-वेतन	१६७६.६८	१००.००	१६७६.६८
२	०२-मजुरी	१.६७	१००.००	१.६७
३	०३-अतिकालीक भत्ता	६.१२	८५००.	५.२०
४	०६-दुरध्वनी ,वीज व पाणी शुल्क	२९.४९	१००.००	२९.४९
५	११-देशांतर्गत प्रवास खर्च	४५.००	८५००.	३८.२५
६	१३-कार्यालयीन खर्च	३४.०९	८५००.	२८.९७
७	१४-भाडे,पट्टी व कर	२३.६६	१००.००	२३.६६
८	२०-इतर प्रशासकीय खर्च	२.२०	८५००.	१.८७
९	२४-पेट्रोल ,तेल, वंगण	१०३.९७	१००.००	१०३.९७
१०	२६-जाहिरात व प्रसिध्दी	०.२५	८५००.	०.२१
११	२८-व्यावसायिक सेवा	०.५०	८५००.	०.४२५
१२	५१-मोटार वाहने	१८.३०	८५००.	१५.५५
१३	५२-यंत्र सामुग्री व साधन सामुग्री	९०.००	८५००.	७६.५
१४	५३-मोठी बांधकामे	५.००	८५००.	४.२५
	एकूण दत्तमत	२०३६.९३	-	२००६.६९५
	५० इतर खर्च भारीत	५.००	८५००.	४.२५

३. मंजूर तरतूदीतून संचालकांनी मासिक खर्च विवरणपत्राप्रमाणे (Monthly Cash Flow) खर्च करावा. वरील खर्च "मागणी क्र.वाय-६, ४४०२-मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च-(००)१०१-मृद सर्वेक्षण व चाचणी - (०१) (०१) एक - भूजल सर्वेक्षण आणि विकास अभिकरण याखालील लहान पाटबंधारे योजना (४४०२ ११३९) दत्तमत व (४४०२ ११४८) भारीत" या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०२१७४१२६५८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: CN = Chetan Balasaheb Nikam, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply And Sanitation
Date: 2016.02.04 15:08:56 +05'30'

(चेतन निकम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
२. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सर्व
३. वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,सर्व
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखापरीक्षा /लेखा व अनुज्ञेयता)
५. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखापरीक्षा / लेखा अनुज्ञेयता)
६. वित्त विभाग, अर्थसंकल्प—२० (२ प्रती)
७. कक्ष अधिकारी,पापु-०४, पापु-२०
८. निवड नस्ती पापु १५